NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: https://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: fao.@sus.ac.in



**वित्त व लेखा विभाग**

जा.क्र. पुअहोसोविसो/वित्त व लेखा विभाग/नगदी विभाग/२०२२-२३/825 दि. २४/०६/२०२२

24 JUN 2022

## परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठातील सर्व शैक्षणिक संकुलाचे संचालक, विभाग प्रमुख तसेच प्रशासकीय विभागांचे प्रमुख यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, दि. ३१ मार्च, २०२२ पासून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या निर्देशानुसार सर्व बँकांकडून बँक खात्यात जमा करावयाच्या रकमेच्या पहिल्या पाच TRANSACTION नंतर CASH HANDLING CHARGES आकारण्यात येत आहेत. सदर चार्जेस विद्यापीठ बँक खात्यातून कपात होत आहेत. याचा नाहक भुर्दंड विद्यापीठास सहन करावा लागत आहे. तसेच नॅक पिअर टिमच्या भेटीच्या वेळी विद्यापीठाने एकूण जमा होणाऱ्या शुल्कापैकी ९४.४४% इतकी जमा रक्कम ही ऑनलाईन पध्दतीने झाल्याचे व ९९.६१% इतक्या रकमेच्या देयकाची आदायगी ही ऑनलाईन पध्दतीने केल्याचे सांगितले होते. त्यामुळे नॅक पिअर टिमने देखील विद्यापीठास सर्व शुल्क १००% ऑनलाईन स्विकारावे व देयकाची आदायगी १००% ऑनलाईन पध्दतीने करावी असे सूचित केले होते. या वर्षापासून विद्यापीठाने एकूण जमा होणारे शुल्क १००% ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याचा व सर्व प्रकारच्या देयकांची आदायगी १००% ऑनलाईन पध्दतीने करण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र शासनाने देखील यापूर्वीच सर्व प्रकारच्या रकमा ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याचा निर्णय घेवून Government Receipt Accounting system (GRAS) कार्यान्वित केली आहे. या पुढे सर्व प्रकारचे शुल्क, अग्रिम, परतावे व इतर रकमा केवळ ऑनलाईन माध्यमाव्दारे (IMPS, NEFT, RTGS, QR CODE, UPI, POS) यांच्या माध्यमातून स्विकारण्यात येतील तसेच सर्व प्रकारची देयके जसे की, सर्व प्रकारचे अग्रिम, बैठकांकरीता उपस्थिती राहिल्यानंतर देण्यात येणारे TA/DA बिल, फर्मची देयके तसेच विविध खर्चाचे परतावे इ. सर्व प्रकारच्या अनुषंगिक खर्चाच्या देयकांची आदायगी केवळ ऑनलाईन माध्यमांव्दारे (IMPS, NEFT, RTGS) व्दारे करण्यात येईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

विविध अग्रीम व खर्चाचे परतावे शिक्षक, प्रशासकीय अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांच्या बँक ऑफ इंडिया येथील वेतनाच्या खात्यात ऑनलाईन पध्दतीने आदा करण्यात येतील तसेच या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर कर्मचाऱ्यांनी केलेल्या खर्चाच्या परताव्याची मागणी करताना संबंधित कर्मचाऱ्यांच्या बँक खात्याचा तपशील तसेच बँक पासबुकची छायांकित प्रत किंवा Cancelled Cheque ची छायांकित प्रत टिपणी सोबत जोडण्यात यावी.

वरील परिपत्रकाप्रमाणे प्रस्तुत विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागाचे संचालक, प्रशासकीय विभागांचे विभाग प्रमुख तसेच सर्व शिक्षक व प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांनी नोंद घेवून कार्यवाही करावी.

(सीए. श्रेणिक शाह)
वित्त व लेखा अधिकारी

प्रति :

१. सर्व शैक्षणिक संकुलांचे संचालक.
२. सर्व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
यांना या परिपत्रकाची प्रत देवून सुचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची दक्षता घ्यावी.

प्रत माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव :

१. मा. कुलगुरु महोदया यांचे कार्यालय.
२. मा. प्र. कुलगुरु यांचे कार्यालय.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय.
४. ज्ञानस्रोत केंद्र, अभ्यासकेंद्र, कौशल्य विकास केंद्र, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर